# भारतीय संविधानाचा विजय असो

नमस्कार दादा/ताई,

26 जानेवारी 1950 रोजी आपल्या भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. म्हणजेच हे वर्ष आपल्या संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. 150 वर्षे इंग्रजांकडून लूट झालेल्या देशाला विकासाची, समृद्धीची आणि भरभराटीची वाट दाखवली ती भारतीय संविधानाने.

## संविधान कोणत्या विचारांनी बनले आहे?



भक्ती परंपरेतील अनेक महान संतांची शिकवण आपल्या संविधानात आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांनी ही मूल्ये आत्मसात करून ती समाजात रुजवली. याच मूल्यांनी गांधीजी, पं. नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मौलाना आझाद, भगतसिंह आणि इतर अनेक नेत्यांच्या नेतृत्वाखालील आपल्या स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली. आपले भारतीय संविधान म्हणजे संतविचार-शिव-शाहु-फुले-आंबेडकरी विचारांचा संगम आहे.

## संविधानाने देशाला एकसंध ठेवले!



परंपरा, संस्कृती, भाषा, जात, धार्मिक श्रद्धा, खाद्यपदार्थ इत्यादींमध्ये वेगळेपण असलेल्या 4,000 हून अधिक समुदायांनी भारत देश बनलेला आहे. इतकी प्रचंड विविधता असूनही, भारत एकसंध आणि एकत्र राहिला आहे. कारण संविधानाने विविधतेचा सन्मान केला. व्यक्ती कोणत्याही धर्म, जात, लिंग, प्रांत, भाषा, गरीब वा श्रीमंत असो, प्रत्येक भारतीयाचा भारतावर आणि संविधानावर समान हक्क आहे. अशाप्रकारे संविधानाने प्रत्येक भारतीयाला सामावून घेतले.

## संविधानाने आपल्याला काय दिले?

आपल्यासोबत स्वतंत्र झालेल्या बऱ्याच देशांमध्ये आज अस्थिरता आणि हुकूमशाही आली आहे. भारतात मात्र आजही लोकशाही कायम आहे. भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याने स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच महिलांसह सर्व प्रौढांना मतदानाचा हक्क दिला. ग्रामपंचायत ते लोकसभेपर्यंत निवडणुकीला उभे राहण्याचा हक्कही संविधानामुळेच मिळाला.

## संविधानाने आपल्या गावाला काय दिले?



आपल्या गावची ग्रामपंचायत आणि सर्वाधिकार असलेली ग्रामसभा घेण्याचा हक्क संविधानाने दिला. 'गाव तिथे शाळा' विचारानुसार गावात शाळा सुरू झाली. गावातील दवाखाना, रस्ता, वीज, पिण्याचे पाणी, संडास, गटारे, जनावरांचा दवाखाना सहकारी विकास सोसायटी, सहकारी दुध डेअरी, सहकारी पत संस्था हे सर्व संविधानामुळेच शक्य झाले.

जमीनदार आणि सावकार यांच्याकडून जमीन घेतली आणि शेतकऱ्यांमध्ये वाटली गेली. शेतकऱ्यांना बी-बियाणे, कीटकनाशके, सिंचन सुविधा, वीज, स्वस्त दरात बँक कर्ज; यासोबतच शेतकऱ्यांच्या पीकाला चांगला भाव मिळण्यासाठी

कृषी उत्पन्न बाजार समित्या – हे सर्व संविधानात असलेल्या लोककल्याणाच्या विचारातून उदयाला आले.

## संविधानाने महिलांना काय दिले?

पूर्वीच्या काळी ‘चूल आणि मूल’ या चौकटीत कैद असलेल्या महिलांना संविधानाने सन्मान दिला. संविधानामुळेच महिलांना शिक्षण घेणे, घराबाहेर पडणे, नोकरी करणे शक्य झाले. म्हणूनच आज विविध क्षेत्रात त्या जबाबदारीच्या जागा सांभाळत आहेत. सरपंच असो वा न्यायाधिश, मुख्यमंत्री असो वा राष्ट्रपती - या सर्व पदांवर महिला पोहोचू शकल्या त्या संविधानामुळेच.

## संविधानाने शोषित-वंचित घटकांना काय दिले?




शतकानुशतके शोषणाचे बळी ठरलेले एससी, एसटी, एनटी, ओबीसी, मराठा यांना समाजाच्या इतर घटकांसोबत समान स्तरावर आणण्यासाठी संविधानाने ‘आरक्षणा’ची तरतूद केली.

यामुळेच आज या सर्व घटकांतील लोक शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर, संशोधक, उद्योगपती, सरकारी अधिकारी बनून सन्मानाचे आयुष्य जगत आहेत.

आज आपले सर्व प्रश्न सुटले आहेत, असे नाही. मात्र आपले सर्व प्रश्न सोडवण्याची हमी भारतीय संविधानच देते, हे नक्की! सामान्य गरिब जनतेच्या उद्धारासाठी सरकार बांधील आहे असं संविधान सांगते.


भारताचे संविधान

उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

परंतु, जर सरकारच याविरोधी वागत असेल तर त्याला योग्य मार्गावर आणण्याची जबाबदारीही संविधानाने तुमच्या, माझ्यावरच सोपवली आहे. संविधानाची पायमल्ली रोखणे, संविधानाचं संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. **संविधानाचे रक्षण म्हणजे तुमच्या माझ्या जगण्याच्या अधिकाराचे रक्षण!**

**संविधानाचे पालन हीच खरी देशभक्ती!**

*चला, ‘संविधान सर्वांचे आहे’ हे प्रत्येकाला सांगूया.*
*संविधानाचा विचार घराघरात पोचवूया..*
*सर्वांशी प्रेमाने-आपुलकीने वागूया, भीती व द्वेषाला दूर सारूया..*
*आपले कुटुंबीय व मित्रांसोबत संविधानाच्या 75 वर्षांचा आनंद साजरा करूया..*

संविधानाचा विचार प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी **‘संविधान जागर अभियान’** सुरू करण्यात आले आहे. तुम्हीही यामध्ये सहभागी व्हा, असे प्रेमपूर्वक आवाहन! **जय हिंद! जय संविधान!**

# संविधान जागर अभियान

स्वप्निल फुसे: 79723 45764 | डॉ.श्याम मुडे: 94047 08852 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739 | श्रद्धा रे. रा.: 92704 78335

**samvidhan.jagar** **samvidhanjagar.org**